ISSN 2394-5303

Issue-40, Vol-02, April-2018

# Printing Area

International Multilingual Research Journal

Editor
Dr.Bapu G.Gholap

14) "A study of the expenditure of Maharashtra Government on ......
Sarita S. Sawarkar, Dr. Dilip M. Misal || 68

15) Decoding Non-Performing Assets in Indian Banking
Dr. Subhash Savant || 71

16) PERFORMANCE EVALUATION OF PUBLIC AND PRIVATE SECTOR......
Dr. Aayesha Shaik || 77

17) ROLE OF HUMAN RIGHTS IN INDIAN DEMOCRACY
Prof. Shende D.D. || 82

18) Effect of Globalization on Indian Management Practices
Prof. Dr. P.M. Taley || 85

19) Micro, Small& Medium Scale Industries in India: An overview
Prof. Dr. Shrinivas V. Joshi, Mr. Yogesh Vishwasrao Torawane || 88

20) USE AND IMPACT OF E-RESOURCES AMONG RESEARCH SCHOLARS ......
C. VINOTH KUMAR, Dr. M. PALANIAPPAN, S. DURAISEKAR || 93

21) A STUDY ON IMPORTANCE OF TRAINING TO THE EMPLOYEES ......
G. Ambika || 100

22) NOTE ON NORMAL DISTRIBUTION AND THE MEAN DIFFERENCE FOR......
Khakre R.A. || 105

23) साहित्य आणि समाज
डॉ. विजय शंकरराव दिघोरे || 109

24) भारतातील दारिद्रय: एक ऐतिहासिक दृष्टिकोन
डॉ. रावसाहेब जी. जाधव || 111

25) 'निराला के प्रगतिशील काव्य 'परिमल' में मानवतावाद'
डॉ. अशोक पंकज || 116

26) ''स्त्री विमर्श एक मूल्यांकन''
डॉ. बोईनवाड एन. एन. || 119

https://sites.google.com/site/vidyawartajournal | http://www.vidyawarta.blogspot.com

23

# साहित्य आणि समाज

डॉ. विजय शंकरराव दिघोरे
भिवापूर महाविद्यालय, भिवापूर,
जि. नागपूर

**प्रस्तावना :**

साहित्याचे समाजशास्त्र ही समाजशास्त्राची विशेष व्यापक अध्ययन शाखा आहे. ज्यात समाजाचे व सामाजिक समूहअंतर्गत अंतर्गतीमाणता व्यापक प्रमाणात व्यक्त केली जाते. पाश्चिमात्य समाजात असे लिखान इ.पी. थॉम्पसन, रेमंड विलीसम्स व इतरानी केले आहे. भारतात साहित्याचे समाजशास्त्र ही अभ्यास शाखा नव्याने उदयास आली आहे. ज्याकडे साहित्य व समाज याकडे विध्दवानाचे लक्ष वेधले आहे.

**साहित्य म्हणजे काय?**

साहित्य शब्दाची उत्पत्ती संस्कृतमध्ये सम + धा + यत = साहित्य सम म्हणजे सम्यक, धा म्हणजे धारण करणे, यत म्हणजे सह यावरून 'सम्यकरूप धारण करणारी शक्ती ज्यात दुसऱ्याचे हित आहे, सहभाग आहे असे साहित्य होय.''

साहित्याला इंग्रजीत Literature असे म्हणतात. त्याची उत्पत्ती letter किंवा लॅटीन भाषेतील Letteria म्हणजे पत्र छापने असा होतो. यावरून रेनवेलेक व ऑस्टीन वारेन यांनी याच अर्थाने साहित्य सज्ञा वापरली आहे.

''जे जे छापलेली लिखान आहे त्यास साहित्य असे म्हणतात. ज्याद्वारे मानवी जीवनाचा बोध होतो, मानवी जीवनाचे आकलन होते, मानवी हिताचा विचार प्रकट केला जातो.''

**मराठी तत्वज्ञान महाकोष —**

''साहित्य म्हणजे एखाद्या विषयासंबंधी उपलब्ध असलेले लिखान होय. ज्यात सृजनशिलता, नवनिर्मिती, स्थळ, काळ, निरपेक्ष सत्यज्ञान किंवा निर्मळ आनंद देनारी भाषा म्हणजे साहित्य होय.''

**रॉबर्ट एस्कॉरपीट —**

''साहित्य म्हणजे प्रचलीत समाजशास्त्रीय पध्दतीचा वापर करणे. समाजशास्त्रीय प्रश्नाची उत्तरे देण्याचा साहित्याचा प्रयत्न असतो ज्यात सामाजिक वास्तवाचे पैलू साहित्याद्वारे मांडले जातात.''

**साहित्याचे समाजशास्त्रीय विश्लेषण :**

समाजशास्त्रज्ञांना साहित्याचा सामाजिक तथ्य म्हणून स्विकार करता येऊ शकेल साहित्य व समाजाचा संबंध दाखविणारी साहित्याचे समाजशास्त्र ही अभ्यास शाखा विकसीत झाली आहे. साहित्य व समाजशास्त्राचे विषय, अभिरूची समान आहेत. म्हणून साहित्याचा समाजशास्त्रीय आशय अनेक समाजशास्त्रज्ञांनी विशद केला आहे. सर्वप्रथम हंगेरीयन समाजशास्त्रज्ञ लुकासने साहित्याचे समाजशास्त्र प्रतिपादन केले. जर्मन समाजशास्त्रज्ञ श्युकिगने समाजशास्त्रीय वाङमय चाचण्या तयार केल्या. ल्युशीएन गोल्डमानने साहित्याच्या समाजशास्त्राचे आशयावर विश्लेषन केले. जॉन पॉलसामेने लेखक वाचकांचा संदेश वाहनाद्वारे संबंध दाखविला, समाजशास्त्राचा जनक ऑगष्ट कॉम्टने वैज्ञानिक दृष्टिकोनातून साहित्याचे अध्ययन केले. पॅरेटोने तार्कीक व अतार्कीक घटकास प्राधान्य देऊन साहित्याचा बोधासाठी अवशेष सिध्दांत मांडला, सोरोकिनने संस्कृतीचा प्रभाव साहित्यावर पडतो. तर मॅक्सवेबरने आदर्श प्रारूपाद्वारे साहित्याचे विश्लेषण केले. एमील दरखईमने साहित्य समाजाप्रमाणे तथ्य संबोधले आहे. तर मार्क्सवाद्यांनी साहित्याच्या सामाजिकतेला प्राधान्य दिले. तर स्पिनबर्गने साहित्याची समिक्षा समाजशास्त्रीय दृष्टीने करावी असे सांगितले.

यावरून साहित्य सामाजिक, सांस्कृतिक जीवनाचा आत्मा आहे. कारण साहित्यातील चित्रनाद्वारे समाजशास्त्राला सामाजिक संबंध, सामाजिक संरचना, विविध समूह, मानवी मन, संवेदना, प्रेरणा, अभिवश्त्ती, सहकार्य, संघर्ष, जिव्हाळा, ताणतनाव विचार—विकार इत्यादीद्वारे सामाजिक संबंधाचे विश्लेषण करता येते. आधुनिक काळात तर साहित्य हा समाजशास्त्रीय अभ्यासाचा विषय आहे. ज्यामुळे स्वत:कडे व

समाजाकडे पाहण्याची दृष्टी निर्माण होते व सांस्कृतिक दृष्टिकोन समजावून घेता येतो.

**साहित्य व समाज संबंध :**

साहित्याचा समाजाशी संबंध : राधाकमल मुखर्जी यांच्या मते साहित्याचा उगम समाज आहे म्हणून साहित्य समाजाच्या चेतनेचा श्वास आहे. कारण साहित्यात सामाजिक तथ्याचे चित्रण असल्यामुळे त्यात समाजजीवनाचे प्रतिबिंब, प्रतिकृती उमटतात. ज्यात साहित्याचा माध्यमातून सामाजिक परिवर्तन सामाजिक सुधारणा, सामाजिक संस्थाची उत्पत्ती, विकास, देश, काल, स्थिती परिस्थितीचे प्रतिबिंब तत्कालीन समाजाची प्रेरणा, विचारप्रवाह, अभिवृत्तीचे प्रतिबिंब मानवी एक्य, सामंजस्य, सामाजिक नियंत्रण, सामाजिक पुनर्रचना इत्यादी उहापोह केला जातो. म्हणून साहित्यातील कल्पना समाज प्रबोधनात साहयकारी ठरतात. नैतिक आध्यात्मिक विकासाचा बोध होतो. जनमनाच्या हृदयाचा विकास करून मानवास सभ्य व सुसंस्कृत बनविते. यासाठी टॉलस्टाय म्हणतो 'साहित्य हे मानवी एकरूपतेचे साध आहे'

**समाजाचा साहित्याशी संबंध :**

साहित्याची निर्मिती समाजसापेक्ष आहे. कारण साहित्यकाच्या व्यक्तीमत्वात सामाजिकता आहे. कारण लेखक ज्या समाजात जन्मला त्या समाजात रूढी, परंपरा, धर्मकल्पना, संकेत, तत्वप्रणाली, आचार विचार, शिष्टाचार यातूनच समाजाची जीवनप्रणाली निश्चित होते. ज्यात व्यक्तिची व्यक्ती म्हणून जडण घडण होतांना तो संस्कार अंशत: स्विकारेल, नाकारेल किंवा त्यांना नवा अर्थ देण्याचा प्रयत्न करेल तेव्हा त्याचा स्विकार नकार व्यक्तीगत न राहता सामाजिक वास्तवाचा आधार ठरतो. उदा. लेखनाची निर्मिती, लेखकाला मिळणारी प्रतिष्ठा, त्याची भाषा, वय, जात आर्थिक स्तर, अवहेलना इत्यादीचा साहित्यावर प्रभाव पडतो.

**समाजाचा साहित्यावर प्रभाव :**

समाजाची सामाजिक व सांस्कृतिक प्रार्श्वभूमी, मुल्य, संदर्भ, संरचनेचा साहित्यावर प्रभाव पडतो. त्यात लेखकावर समाजाचा प्रभाव असतो. कारण धर्म, प्रथा, कायदे सामाजिक, आर्थिक परिस्थिती साहित्यास प्रभावीत करते. म्हणून साहित्याची उत्पत्ती, विकास, उत्थान, पतन समाजाशी निगडीत आहे. उदा. समाजात होणाऱ्या परिवर्तनाचा परिणाम साहित्य निर्मितीवर व त्याच्या स्वरूपावर होतो.

**साहित्याचा समाजावर प्रभाव :**

साहित्याचा समाजावर निर्णायक प्रभाव पडतो कारण साहित्य समाजाचे वाहक, रक्षक व सामाजिक दस्तऐवज आहे साहित्य समाजात सामंजस्य निर्माण करून समाजाला आकार देते व सामाजिक परिवर्तन घडविते. ज्यात साहित्यात व्यक्तीला अभिरूची, त्याची मानसिकता, सामाजिक आंतरक्रिया, त्याची कौटुंबिक व आर्थिक स्थितीवरच व्यक्तीच्या व्यक्तीमत्वाचे प्रतिबिंब दिसते.

**साहित्य व समाज परस्परपुरक संबंध :**

साहित्यातून सामाजिक अनुभव प्रकट केले जातात. समाजाच्या विकासाबरोबर साहित्याचा विकास होतो. सामाजिक परिवर्तनाचा प्रभाव साहित्यावर व साहित्याचा परिवर्तनाचा परिणाम समाजावर होतो. म्हणून समाज साहित्याला व साहित्य समाजाला परस्पर पुरक आहेत. साहित्य व समाजाचा परस्पर संबंध बोनाल्ड, जेम्स रॉईट, जार्ज लुकास, ल्युशीएन गोल्डमन एच.डी. डंकन, मार्क्स व एंजल्सनी सांगितला. साहित्य सांस्कश्तीक घटना आहे. साहित्याचा अविष्कार समाज सापेक्ष असतो. साहित्यात जीवनविषयक प्रेरणा असतात. साहित्याच्या निर्मितीत त्या समाजातील विचार असतात. समाजातील विचारांचा साहित्यावर ठसा उमटलेला असतो. उदा. कलावंतांच्या मनोवश्त्तीचे प्रतिबिंब साहित्यात पडत असते. परंतू त्यांच्या मनोवश्त्ती समाजातून घटत असतात. समाजाच्या विचार सरणीचे प्रतिबिंब साहित्यात पडत असते.

समाज प्रबोधजात साहित्याची मौलीक भूमिका राहिलेली आहे. समाज व साहित्य हे एक दुसऱ्यामुळे प्रभावीत झालेले दिसुन येतात. समाज जीवन हे साहित्यातून प्रतिबिंबीत झालेले दिसुन येतात. समाजातील व्यक्तीची सुख – दु:खे, त्यांच्या भावना, समजूती, आचार–विचार, रूढी व परंपरा या साहित्यातून प्रकट होत असतात. साहित्यातून समाज जीवन व समाज जीवनातून साहित्य उदयास येत असते. साहित्य व समाजाचे अनन्य साधारण परस्पर पुरक कार्यकारण संबंध आहे.

संदर्भ सूची :

१. मराठी तत्वज्ञान महाकोष मंडळ, पुणे

२. समाज आणि साहित्य – अविनाश सहस्त्र बुध्दे, प्रकाशक आर जी देसाई, लोकवाङमय गृह गिरगाव मुंबई, प्रथम आवृत्ती १९८०

३. साहित्य सुची – साहित्य व समाजसंबंध जुलै १९८८

४. साहित्य व समाजजीवन – पेंडसे लालजी

५. साहित्य और समाज – हिंदी प्रचारक पुस्तकालय बनारस १९५५

६. साहित्य का समाजशास्त्र – व्ही.जी. गुप्ता प्रकाश, सिताराम गुप्ता, सिता प्रकाशन, हाथरस १९८७

७. दलीत साहित्याचे विश्लेषण लेख साहित्य व समाज – प्रभाकर मांडे प्रकाशीका साहित्य व समाज – सौ. आशा मांडे बन्सीलाल नगर, औरंगाबाद १९७९

❑❑❑

24

# भारतातील दारिद्रय: एक ऐतिहासिक दृष्टिकोन

डॉ. रावसाहेब जी. जाधव
'सार्थक' दाभड, दाभड – बामणी रोड,
ता. अर्धापूर, जि. नांदेड.

**प्रस्तावना:**

दीर्घकाळाचा विचार करता अर्थशास्त्रज्ञ व सामाजिक विचारवंतांमध्ये दारिद्रयाच्या प्रमुख कारणाबाबत सातत्याने मतभेद राहिलेले आहेत. दारिद्रय उद्भवण्याच्या प्रमुख कारणाबाबत विचारवंतांमध्ये मतैक्य नसल्याने भारतात योजना कालावधीमध्ये दारिद्रय निवारण्यासाठी प्रभावी उपायांचा अवलंब होऊन सुध्दा दारिद्रयाची तीव्रता फारशी कमी झालेली नाही. त्यामुळे दारिद्रय निवारण्याची संभाव्य उपाययोजना अधिक प्रभावी व्हावी ह्यासाठी प्रस्तुत शोधनिबंधात संशोधकाने ऐतिहासिक दृष्टिकोनातून दारिद्रयाचे प्रमुख कारण शोधण्याचा प्रयत्न केला आहे. शोधनिबंधात निसर्ग अवस्था, प्राचीन कालावधी, मध्ययुग व ब्रिटीश तसेच स्वातंत्र्य व स्वातंत्र्योत्तर कालावधीचा संक्षिप्त आढावा घेतला आहे.

**शोधनिबंधाची उद्दिष्टये:**

१. दारिद्रयाच्या स्थितीबाबत ऐतिहासदृष्टया आढावा घेणे.

२. दारिद्रयाचे प्रमुख कारण शोधणे.

३. दारिद्रय निवारण्याच्या संभाव्य उपाय सूचविणे.

**संशोधन पध्दती:**

प्रस्तुत शोधनिबंध तयार करतांना संशोधकाने निसर्ग अवस्थेपासून जागतिकीकरणाच्या कालावधीपर्यंत दारिद्रयाचा आढावा घेण्यासाठी विविध प्रकाशित साहित्यांचा – (संदर्भग्रंथ) दुय्यम साधन सामग्रीचा आधार घेतला आहे.